## दिवाणी किर. अर्ज नं. ४०१/२०१२ मधील नि.१२८ खालील आदेश

**CNR : MHSN06001409-2012**

**(रामचंद्र कदम वि लहुदास कदम आणि इतर)**

युक्तीवाद ऐकला, अभिलेखाची पाहणी केली. सदरचा दावा हा वादी यांनी जाहिर होऊन मिळणेकरीता, तथाकथित बोगस खरेदीदस्त रद्द होऊन वादीवर बंधनकारक नाही असे घोषीत होऊन मिळणेकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. वादीतर्फे सदरचा अर्ज हा प्रतिवादी क्र. ०१ लहुदास सखाराम कदम हे दि.२३.१०.२०२१ रोजी मालगाव, ता. मिरज, जि. सांगली येथे मयत झालेले आहेत. प्रतिवादी क्र.०१ यांचे वारस अभिलेखावर घेणेकरीता परवानगी मिळावी म्हणून दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. ०१ यांचे वारस-

**१/१ लहुदास रामचंद्र कदम (मयत)**

**वारस**

**१/१ श्री. रुपचंद लहुदास कदम (मुलगा)**
वय-६० वर्षे, व्यवसाय- व्यापार

**१/२ श्री. गोकुळदास लहुदास कदम (मुलगा)**
वय-५८ वर्षे, व्यवसाय- शेती

**१/३ श्री. मच्छिंद्र लहुदास कदम (मुलगा)**
वय-५७ वर्षे, व्यवसाय- शेती

**१/४ मिना गोरख शिंदे (मुलगी)**
वय-४० वर्षे, व्यवसाय- घरकाम
रा. - उत्तमनगर, म्हसवड, जि. सातारा

**१/५ बेबी भगवान पोळ (मुलगी)**
वय-३९ वर्षे, व्यवसाय- घरकाम
रा. - मायाक्का मंदिराजवळ, मायाक्का चिंचली,
ता. रायबाग, जि. बेळगाव

सदरचे प्रतिवादी क्र.०१ चे वारस १/१, १/२, १/३, १/४, १/५ हे दावेकामी अभिलेखावर दाखल करणेस, तसेच सदर अर्जाप्रमाणे दाव्याच्या सरनामेत दुरुस्त

करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे. सदर कामातील प्रतिवादी क्र. ०३ हे मयत प्रतिवादी क्र. ०१ या कामी अगोदरच रेकॉर्डवर आहेत. सबब त्यांना या कामी नव्याने वारस म्हणून अभिलेखावर घेणेची जरुरी नाही अशी विनंती केली आहे.

**०२.** सदर अर्जास प्रतिवादी यांनी अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदविला. ते कथन करतात की, प्रतिवादी क्र. ०१ हा मयत झाले असून त्यांचे वारस अभिलेखावर येणे गरजेचे व कायदेशीर असलेने मुदतीत वारस आणलेले नाहीत. सबब योग्य तो हुकूम व्हावा अशी विनंती केली आहे.

**०३.** दाव्याचे स्वरुप लक्षात घेता, वादीतर्फे सदरचा अर्ज हा प्रतिवादी क्र. ०१ लहुदास सखाराम कदम यांचे वारस अभिलेखावर घेणेकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.०१ यांच्या वारसांना सदरचा दावा चालविण्याचे व त्यांचे म्हणणे लक्षात घेण्याची संधी देणे न्यायोचीत वाटत आहे. वादी यांनी अर्जात नमुद केलेले कारण हे पुरेशे व योग्य असल्याचे दिसून येत आहे. वादी यांना त्या अनुषंगे दाव्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. दाव्याचे स्वरुप नैसर्गिक न्यायतत्व लक्षात घेता, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**०१.** अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

**०२.** वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०१ यांचे वारस अभिलेखावर आणावे. त्या अनुषंगाने दाव्याच्या सरनाम्यात आज पासून १४ दिवसाच्या आत नि. क्र. ०१ वर दुरुस्ती करावी.

सही/-
(श्रीमती एम. एस. मनगुळी)
दि.१०.०३.२०२२ दुसरे सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S.P. Patil |
| Court | : | II[nd] Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Date of Decision | : | 10/03/2022 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 10/03/2022 |
| Order uploaded on | : | 10/03/2022 |